
© TRUPTI CHOUDHARY ·
मे · २०१५
अनाहत
साहित्य संस्कृती प्रकाशन

# अनाहत मे २०१५

कविता मनात असते. ती कागदावर, वाचकांसमोर येते तेव्हा संवादाचे एक वर्तुळ पूर्ण होते. मे महिन्याचा अनाहत प्रकाशित करतांना अनाहतला एक वर्ष पूर्ण झाले याचा विशेष आनंद आहे. कविता आणि जाणिवा यांचा हा प्रवास आपल्या सहकार्यामुळे शक्य झाला.
अनाहतची मुखपृष्ठे तसेच त्यामधील कविता यांना  ईमेल, गूगल ॲप, सोशल मेडीया येथे उत्तम प्रतिसाद मिळाला.
कवितांवर असलेला आपला स्नेह असाच वाढेल याची खात्री आहे.
सर्व वाचक, कवी आणि हितचिंतकांचे मन:पूर्वक आभार.
-सोनाली जोशी
साहित्यसंस्कृती प्रकाशन

अनुक्रमणिका

सख्य....................................................................४

आढावा ..................................................................५

तफावत..................................................................६

एका हिरव्या पानाचे मन ..............................................८

भटक्या विमुक्तांची कैफियत— .......................................९

स्त्रीत्व ..................................................................११

कोणीच असा नाही.....................................................१२

प्रार्थनेच्या तिथे देह असतो मुका......................................१३

रस्ता....................................................................१४

## सख्य

काही कविता म्हणजे नातीच असतात
हक्काची, रक्ताची
चुकलेल्या पाखरासारखं
जावं त्याच्या आसऱ्याला

काही नाती म्हणजे कविताच असतात
लाघवाच्या, प्रत्ययाच्या
स्वप्नामधल्या सत्यासारखं
बळ देतात जगण्याला

काही कविता म्हणजे नातीच असतात,
काही नाती कविता!

**-हेमांगी वाडेकर**

## आढावा

बहि-या शांततेवर सामुहिक अत्याचार म्हणजे तुमचे धर्मोत्सव

येशुचा खिळा रामाचा बाण अंबेची तलवार बादशाहाची समशेर कन्हैयाचे सुदर्शन स्वादुपिंडात काय काय रुतवुन घेतलंय मी

बोधीवृक्षाच्या बिया खावून पिलोय मिनरल वॉटर कालिंदिच्या डोहात भंडा-या डोंगरावर बसून दिपलोय कोहेतूरच्या लख्ख कल्लोळाने

खाटिकखाना आणि बगिच्याच्या मधोमध मी बांधणारै पिंपळपार हरेक फांदीच्या सांध्यात डॉल्बी सिस्टम्स बसवुन सोडणारै फांदीगणिक एकेक माईक खाली व्हाईसफिल्टर सहित

आधी मला एकेक झेरॉक्स प्रत द्या आपापल्या धर्मलंपट कौतुकाची

उद्या मानवता येणारै आढावा मागायला शांतिची प्रतिनिधि म्हणून तिच्या पुढे काय ठेवू ..??

**- सतीश दराडे**

## तफावत

तो आल्यावर घरी संध्याकाळी
टाकतो सोफ्यावर अंग

सोडतो गाठ टायची
आणतो चेह-यावर भाव
तपशिलाने दिवसभरच्या कामाचा

पाहताच त्याचा थकलेला चेहरा
ती येते धावतच लगबगीने
घेऊन हातात पाण्याचा पेला
तिच्याही चेह-यावरून वाहत असतो
दिवसभराच्या तणावाचा ओघळ

तो सांगतो दिवसभराच्या गमज्या
घेत थोडा थोडा पॉज
वाचतो पाढा स्वत:च्या व्यस्ततेचा
पण टाळतो सांगणे
बॉसने रागावल्याचे -फाईल अर्धवट पाहून

बापाला त्रास होऊ नये म्हणून
तिने बंद केलंय मुलांच
संध्याकाळी टीव्ही बघण अन खेळणं
मुलं हिरमुसली तरी चालेल पण
त्याला त्रास नको म्हणून

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

ती करत असते धावतपळत सारं
अवाक्षरही न काढता
सहन करते दगदग दिवसाभराची
दिसू देत नाही शीण चेह-यावर
कसलाही लवलेश थकल्याचा

सांभाळतांना संसाराची गाडी
दोघेही थकतात, करतात कष्ट
तफावत असते किती
दोघांच्या विचारात आणि थकव्यात?

**-इरफान शेख**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

# एका हिरव्या पानाचे मन

एका हिरव्या पानाचे मन
शिरू पाहत होते पिवळया पानाच्या कुशीत ....
गंधाचा नुकताच स्पर्श झालेला
कळीचा श्वास व्याकूळ झाला
त्या पिवळया पानाच्या कडा पाणावलेल्या बघून ...
आणि झाडाला तेव्हाच जाणीव झाली अनपेक्षितपणे
पानगळ थांबल्याची
शिशिराला विकल होऊन गाताना झाडाने आज

पहिल्यांदाच ऐकलंय ...

**-अभिरूची**

## भटक्या विमुक्तांची कैफियत...

कुठला श्रावण, कुठल्या सरी ...
कामासाठी गावोगावी, अन भाकरीसाठी दारोदारी,
म्हणून म्हणतो, आम्हा भटक्या विमुक्तांना,
कुठला श्रावण, कुठल्या सरी ...

आजही आहे समाजात विषमतेची दरी
गुन्हेगारी मात्र नेहमी आमच्याच माथ्यावरी,
म्हणून म्हणतो, आम्हा भटक्या विमुक्तांना,
कुठला श्रावण, कुठल्या सरी ...

शिकलो तरी मिळे न नोकरी
आजही करावी लागते प्रस्थापितांचीच चाकरी,
म्हणून म्हणतो, आम्हा भटक्या विमुक्तांना,
कुठला श्रावण, कुठल्या सरी ...

मांस, मच्छी, मटन करी
आम्हा न मिळे शिळी भाकरी,
म्हणून म्हणतो, आम्हा भटक्या विमुक्तांना,
कुठला श्रावण, कुठल्या सरी ...

जगण्याशी आमची रोजच मारामारी
कोण विचारतो आम्हाला शासन दरबारी
म्हणून म्हणतो, आम्हा भटक्या विमुक्तांना
कुठला श्रावण, कुठल्या सरी
...
भांडवलदार, नोकरदार बुद्धिवंत विरंगुळयसाठी भटकतो दऱ्या खोरी
आमच्या नशिबी मात्र नेहमीच गाव गोदारी,
म्हणून म्हणतो, आम्हा भटक्या विमुक्तांना,
कुठला श्रावण, कुठल्या सरी ...

संविधानिक हक्कासाठी वणवण राजकीय दरबारी
पण कायमच झाली आमची थट्टा मस्करी,
म्हणून म्हणतो, आम्हा भटक्या विमुक्तांना,
कुठला श्रावण, कुठल्या सरी ...

आजही उपजीविकेची भ्रांत घरोघरी
हीच आंम्हा समस्त विमुक्त भटक्यांची कैफियत खरी,
म्हणूनच म्हणतो मित्रांनो , आम्हा भटक्या विमुक्तांना,
कुठला श्रावण, कुठल्या सरी ...

**-विनायक लष्कर**

साहित्य संस्कृती
संस्कृती, कला, आणि साहित्य जोडणारा सेतू

## स्त्रीत्व

अक्षांक्षांच्या-रेखांशांच्या रांगोळयांनी सजलेला
दुनिया आहे की कोणाचा पदर नक्षीने नटलेला..

टिकलीइतके श्वास मनांचे चढती किंवा कोसळती
तरी सदोदित श्वास जगाचे..टिकलीच्या परिघाभवती

कधी मनाच्या अलीकडे तर कधी तनूच्या पल्याड ती
कधी कोंब मातीचा बनते, कधी भासते उजाड ती

श्रृंगारासम अपूर्ण केव्हा, कधी पूर्णता कळलेली
हे जग म्हणजे तिची बांगडी, जगता-जगता टिचलेली

ती या टिचक्या बांगडीसही हासत-हासत चालवते
अन् मग हे जग त्या स्त्रित्वाच्या अस्तित्वाने घमघमते..

**--सुशांत खुरसाले**

## कोणीच असा नाही

कोणीच असा नाही जो प्रेमाने जळला नाही
एकांत मिळाल्यावरती जो घळघळ रडला नाही

तू सोडून गेल्यावरती बघ काय असे हे झाले
या संसाराचा आता 'त्या' मोहच उरला नाही

तू नकोस फोडू टाहो अन नाव पुकारू त्याचे
तो पाठ फिरवल्यावरती माघारी वळला नाही

जो तुला पाहिल्यावरती एकदा हासला होता
तो पुन्हा कधीही फिरुनी त्यानंतर हसला नाही

एवढे हाल झाले की मी काय तुम्हाला सांगू
पण ओरखडाही साधा हृदयावर उठला नाही

**-प्रमोद खराडे**

## प्रार्थनेच्या तिथे देह असतो मुका

प्रार्थनेच्या तिथे देह असतो मुका
पाहतो चाळुनी काय झाल्या चुका।

कर्म करतो, नी करतो, नी करतो सदा

घाम गळतो, नी गळतो, नी गळतो सदा
वासनेच्या घरा मोकळे द्वार हे
चक्र थांबेचना वादळाचे जसे

अपरिमीत गरजा नी इच्छा इथे
कोणते घ्यायचे कोण सोडायचे
सांग पुरवायच्या कोणत्या या भूका?
प्रार्थनेच्या तिथे देह असतो मुका।

आज याच्या वरी,काल त्याच्या वरी

कर्म याचे जरी,भार त्याच्या वरी

ढकलुनी का कुणाची ढळे सावली ?
पावलाशी पुन्हा आढळे सावली !

वेळ उधळायची हात राखू नको

पावले टाकली पाय झाकू नको
सांगतो होउनी मीच माझा तुका
प्रार्थनेच्या तिथे देह असतो मुका।

**- मनीषा साधू -**

# रस्ता

लेखन आणि निवेदन - कामिनी केंभावी
ऑनलाईन ऑडियो - रस्ता

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

*प्रकाशक- साहित्यसंस्कृती प्रकाशन*

[www.sahityasanskruti.com](http://www.sahityasanskruti.com)

संपादन- सोनाली जोशी

मुखपृष्ठ छायाचित्र- तृप्ती चौधरी

मुखपृष्ठ -मयूर कुलकर्णी(atizmayur@gmail.com)

*All rights reserved.*

*No part of these poems can be published without the written consent of the poet/poetess.*

To submit your poems and writing please send an **email to-**

anahatmagazine@gmail.com

**Please like us on Facebook at**

***www.facebook.com/sahityasanskruti***

***Thank You!***